नीती आयोगाच्या शाश्वत विकास उद्दिष्टांच्या निर्देशांकांमध्ये महाराष्ट्राने विभागनिहाय आणि परिणामाधारित नियोजन करावे - मुख्यमंत्री फडणवीस >>पान 2

चरणसेवाने जपले लाखो वारकऱ्यांचे आरोग्य >>पान 3

राष्ट्रीय आयुष वारी... विठ्ठल-रुक्मिणीच्या चरणी; पंढरपुरात वारकऱ्यांसाठी आयुष सेवा सुविधा केंद्र >>पान 4

**सुविचार**

माणसाचे प्रेम हे धरती सारखे असते अगोदर एक दाणा पेरावा लागतो.


# दैनिक आपला विदर्भ

apalavidarbhlivenews@gmail.com

मुख्य संपादक : देविदास खनपटे मो. 9767233034

■ बुलढाणा ■ वाशिम ■ यवतमाळ ■ अमरावती ■ वर्धा ■ नागपूर ■ गोंदिया ■ भंडारा ■ चंद्रपूर ■ गडचिरोली ■ छत्रपती संभाजीनगर ■ मुंबई

■ दैनिक ■ बुलडाणा ■ वर्ष 05 ■ अंक 09 ■ शुक्रवार, दि. 24 जुलै 2026 ■ पाने 4 ■ किंमत रू. 2 ■ RNI.NO.MAHMAR/2023/88006





पुन्हा नवे रोमँटिक ट्रॅक मधोश! यश-तारा सुतारियाची जबरदस्त केमिस्ट्री तर नयनताराचीही खास झलक

आतील पान

# पेपरफुटी रोखण्यासाठी कायदा आणणार

## कठोर शिक्षेची तरतूद, पंतप्रधान नरेंद्र मोदींचे आश्वासन; राहुल गांधींचा पलटवार



नवी दिल्ली : पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी दिल्लीतील विद्यार्थ्यांच्या आंदोलनाच्या पार्श्वभूमीवर गुरुवारी सकाळी एक पोस्ट शेयर केली होती. यानंतर पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी एक व्हिडिओ जारी केला आहे. या व्हिडिओच्या माध्यमातून पंतप्रधान मोदींनी फास्ट ट्रॅक कोर्टासंदर्भात माहिती दिली.

पंतप्रधान नरेंद्र मोदी काय म्हणाले? मित्रांनो, मला माहिती आहे, पेपर लीक ही किरकोळ विषय नाही, लाखो विद्यार्थी आणि त्यांच्या पालकांसाठी खूप त्रासदायक आहे. त्यामुळं पेपर लीक घटनेनंतर आतापर्यंत गेल्या अडीच महिन्यात अनेक पावलं टाकण्यात आली. गुन्हेगारांना पकडण्यात आलं, ते तुरुंगात आहेत. आपली महत्त्वाची जबाबदारी होती, विद्यार्थ्यांचं वर्ष वाया जाऊ नये, तात्काळ परीक्षा घेण्याची गरज होती. सरकारनं सर्व शक्तीचा वापर करत २२ लाख विद्यार्थ्यांच्या परीक्षेचे आयोजन केलं. पाच सहा दिवसांपूर्वी १९ तारखेला निकाल देखील आला. देशात पास झालेल्या विद्यार्थ्यांच्या आनंदाच्या बातम्या देखील आल्या.

आम्ही त्यामध्ये समाधान माननारे लोक नाही, मी आज फास्ट ट्रॅक कोर्टासाठी विभागांना आदेश दिले होते. विभागानं दिवसभर मेहनत करुन रात्री मला मसुदा दिला आहे. फास्ट ट्रक कोर्ट आणि कठोर शिक्षेचा मसुदा त्यावर कॅबिनेटमध्ये चर्चा होईल, तिथं अंतिम चर्चा होईल. सोमवारपासून संसद अधिवेशनाचा दुसरा आठवडा येईल, त्यावेळी लवकरात लवकर ते बील पास करण्याचा प्रयत्न केला जाईल, असं पंतप्रधान मोदी म्हणाले.

मी संबंधित विभागांना फास्ट-ट्रॅक न्यायालय स्थापन करण्याचे निर्देश दिले. विभागांनी मला उशिरा रात्री यासंबंधीचा प्रस्ताव सादर केला. फास्ट-ट्रॅक न्यायालय आणि कठोर शिक्षेची तरतूद असलेल्या या प्रस्तावावर शुक्रवारी मंत्रिमंडळाच्या बैठकीत चर्चा केली जाईल. मंत्रिमंडळातील सहकाऱ्यांच्या सूचनांनंतर याला अंतिम स्वरूप दिले जाईल आणि सोमवारपासून संसदेचे दुसरे आठवड्याचे कामकाज सुरू होत असल्याने, हे विधेयक लवकरात लवकर सभागृहात मंजूर करून घेण्याचे प्रयत्न केले जातील, असं पंतप्रधान नरेंद्र मोदी म्हणाले.

याला प्रत्युत्तर म्हणून काँग्रेस नेते राहुल गांधी यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदींवर टीका केली; कारण मध्यरात्रीच्या सुमारास प्रसिद्ध केलेल्या आपल्या व्हिडिओ संदेशात मोदींनी शिक्षण मंत्री धर्मेंद्र प्रधान यांच्या राजीनाम्याचा मुद्दा टाळला होता.

### राहुल गांधी यांच्या तीन मागण्या



एक्सवरील एका पोस्टमध्ये राहुल गांधी म्हणाले, पंतप्रधानांनी विद्यार्थ्यांच्या बुद्धिमत्तेचा अपमान करू नये. विद्यार्थी धर्मेंद्र प्रधान यांच्या राजीनाम्याची मागणी करत आहेत. मध्यरात्रीच्या या केविलवाण्या व्हिडिओद्वारे त्यांच्या बुद्धिमत्तेचा अपमान करू नका. १. धर्मेंद्र प्रधान यांना पदावरून हटवा. २. ज्यांनी विद्यार्थ्यांना मारहाण केली त्यांना शिक्षा करा. ३. माफी मागा, अशी तीन मागण्या राहुल गांधी यांनी करत टीका केली.

## नीट पेपरफुटी प्रकरणात सर्वात मोठं वळण! मुख्य सूत्रधार संजीव मुखियाविरोधात ठोस पुरावा नाही; सीबीआयचा धक्कादायक खुलासा

पाटणा : अत्यंत चर्चेत असलेल्या नीट-यूजी २०२४ परीक्षा पेपरफुटी प्रकरणाबाबत गुरुवारी एक महत्त्वाची बाब समोर आली आहे. केंद्रीय अन्वेषण विभागानं (सीबीआय) आपल्या तपासात असं नमूद केलं आहे की, परीक्षा माफियाचा म्होरक्या म्हणून कुख्यात असलेल्या संजीव कुमार (उर्फ संजीव मुखिया) याच्याविरुद्ध नीट-यूजी प्रश्नपत्रिका चोरणं, ती सोडवून घेणं किंवा उमेदवारांमध्ये तिचं वितरण करणं या कटात त्याचा सहभाग असल्याचं सिद्ध करणारा कोणताही पुरावा सापडलेला नाही. बिहार पोलीस कॉन्स्टेबल भरती परीक्षेच्या पेपरफुटी प्रकरणात संजीव मुखिया सध्या न्यायालयीन कोठडीत (ज्युडिशिअल कस्टडी) आहे.



पेपरफुटीच्या मुद्द्यावरून देशभरात दीर्घकाळापासून वाद आणि निदर्शने सुरू आहेत. बुधवारी बिहारची राजधानी पाटणा इथं विद्यार्थ्यांची निदर्शनं झाली. यामध्ये पोलीस आणि आंदोलक यांच्यात संघर्ष झाला. या घटनेत अनेक पोलीस कर्मचारी आणि प्रसारमाध्यमांचे प्रतिनिधी जखमी झाले. दरम्यान, सीबीआयचा तपास अहवाल समोर आल्यानंतर या प्रकरणानं एक नवीन वळण घेतलं आहे.

संजीव मुखियाच्या विरोधात कोणताही पुरावा नाही : तपास यंत्रणेच्या मते, ''प्रश्नपत्रिका चोरीला जाणं, ती सोडवून घेणं किंवा उमेदवारांमध्ये तिचं वाटप करणं या संपूर्ण कटात संजीव मुखिया यांचा सहभाग होता. हे सिद्ध करणारा कोणताही ठोस पुरावा सखोल तपासादरम्यान आढळला नाही.'' सीबीआयनं स्पष्ट केलं आहे की, सखोल तपासानंतर त्यांनी प्रश्नपत्रिका फुटीचा संपूर्ण कट आणि त्यात सामील असलेल्या सर्व मुख्य आरोपींची ओळख पटवली आहे. याव्यतिरिक्त, चोरीच्या प्रश्नपत्रिकेचा लाभ घेतलेल्या उमेदवारांचीही ओळख पटवण्यात आली आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, तपास पूर्ण झाल्यानंतर सीबीआयनं पाटण्यातील विशेष सीबीआय न्यायालयात विविध टप्प्यांवर ४५ आरोपींविरुद्ध आरोपपत्रं दाखल केली आहेत. उपलब्ध पुराव्यांच्या आधारे हे संपूर्ण जाळं उघडकीस आलेत. तपास तार्किक निष्कर्षापर्यंत पोहोचला असल्याचा दावा या तपास संस्थेनं केला आहे. या प्रकरणाचा प्राथमिक तपास बिहारच्या इकॉनॉमिक ऑफ ेन्सेस युनिटनं केला होता. ईओयूनं आपला सविस्तर अहवाल सर्वोच्च न्यायालयाला सादर केला. त्यानंतर, प्रकरणाचं गांभीर्य लक्षात घेत तपास सीबीआयकडं सोपवला. यानंतर या केंद्रीय तपास संस्थेनं विविध राज्यांमध्ये छापे टाकून पुरावे गोळा केले आणि विविध आरोपींची चौकशी केली.



## लाठीचार्जाच्या जखमांवर माणुसकीची फुंकर

## जंतर-मंतरवर विद्यार्थ्यांच्या मदतीला धावले

# मेहकरचे नेतृत्व











**दैनिक आपला विदर्भ**

## विद्यार्थ्यांवर लाठीचार्ज अन् मेहकरचे युवा नेतृत्व थेट दिल्लीत; नगराध्यक्ष किशोर गारोळे यांचा जंतर-मंतरवर सरकारला इशारा

### केंद्रीय शिक्षण मंत्री धर्मेंद्र प्रधान यांच्या राजीनाम्यासह विविध मागण्यांसाठी विद्यार्थ्यांचे आंदोलन; नगरसेवक महेश रिंढे व प्रा. विठ्ठल कांगणे यांचीही उपस्थिती

**नवी दिल्ली / मेहकर :** राजधानी दिल्लीतील जंतर-मंतर येथे केंद्रीय शिक्षण मंत्री धर्मेंद्र प्रधान यांच्या राजीनाम्यासह शिक्षण व्यवस्थेतील विविध प्रश्नांवर विद्यार्थ्यांचे आंदोलन तीव्र झाले आहे. या आंदोलनादरम्यान विद्यार्थ्यांवर झालेल्या कथित लाठीचार्जचा तीव्र निषेध व्यक्त करत शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाचे मेहकर नगराध्यक्ष किशोर गारोळे यांनी थेट दिल्ली गाठून आंदोलनस्थळी विद्यार्थ्यांना जाहीर पाठिंबा दिला.

यावेळी त्यांच्यासोबत मेहकर नगरसेवक महेश रिंढे तसेच विद्यार्थ्यांच्या प्रश्नांवर सातत्याने संघर्ष करणारे प्रा. विठ्ठल कांगणे हेही उपस्थित होते. आंदोलनस्थळी विद्यार्थ्यांशी संवाद साधत त्यांनी त्यांच्या मागण्या जाणून घेतल्या तसेच विद्यार्थ्यांवरील बळाच्या वापराचा निषेध नोंदविला.

याचवेळी त्यांनी सामाजिक बांधिलकी जपत आंदोलनस्थळी उपस्थित विद्यार्थ्यांना केळी व पिण्याच्या पाण्याच्या बाटल्यांचे वाटप केले. विद्यार्थ्यांच्या न्याय्य मागण्यांना पाठिंबा देतानाच त्यांच्या आरोग्याची आणि मूलभूत गरजांचीही काळजी घेत, आंदोलनात सहभागी विद्यार्थ्यांना आवश्यक मदत पुरविण्यात आली. या उपक्रमातून विद्यार्थ्यांप्रती संवेदनशीलता आणि माणुसकीचा संदेश देण्यात आला.

नगराध्यक्ष किशोर गारोळे म्हणाले, लोकशाहीत विद्यार्थ्यांना शांततेच्या मार्गाने आंदोलन करण्याचा घटनात्मक अधिकार आहे. त्यांच्या न्याय्य मागण्यांकडे दुर्लक्ष करून त्यांच्यावर लाठीचार्ज करणे अत्यंत दुर्दैवी आहे. युवक आणि विद्यार्थी हे देशाचे भविष्य आहेत. त्यांचा आवाज दडपण्याऐवजी सरकारने त्यांच्या मागण्यांवर तातडीने सकारात्मक निर्णय घ्यावा. केंद्रीय शिक्षण मंत्री धर्मेंद्र प्रधान यांनी नैतिक जबाबदारी स्वीकारून राजीनामा द्यावा.

मेहकरमध्ये युवा नेतृत्व म्हणून ओळख असलेले किशोर गारोळे हे नेहमीच विद्यार्थ्यांच्या शिक्षण, रोजगार आणि भविष्यासंदर्भातील प्रश्नांवर ठाम भूमिका घेत आले आहेत. त्यामुळे विद्यार्थ्यांच्या आंदोलनाला प्रत्यक्ष दिल्लीत जाऊन दिलेला त्यांचा पाठिंबा हा युवकांप्रती असलेल्या त्यांच्या बांधिलकीचे प्रतीक मानला जात आहे. मेहकरसह परिसरातील मोठा युवावर्ग त्यांच्यावर विश्वास व्यक्त करतो आणि युवकांच्या प्रश्नांवर सातत्याने आवाज उठवणारे नेतृत्व म्हणून त्यांची ओळख आहे.

दिल्लीतील जंतर-मंतर हे देशातील विविध लोकशाही आंदोलनांचे प्रमुख केंद्र मानले जाते. सध्या सुरू असलेल्या विद्यार्थ्यांच्या आंदोलनात केंद्रीय शिक्षण मंत्री धर्मेंद्र प्रधान यांच्या राजीनाम्याची मागणी, शिक्षण व्यवस्थेतील सुधारणा, परीक्षा प्रक्रियेतील पारदर्शकता आणि विद्यार्थ्यांच्या विविध प्रश्नांवर तातडीने निर्णय घेण्याची मागणी करण्यात येत आहे. या आंदोलनाला महाराष्ट्रातून मिळालेला पाठिंबा लक्षवेधी ठरत असून, नगराध्यक्ष किशोर गारोळे, नगरसेवक महेश रिंढे आणि प्रा. विठ्ठल कांगणे यांच्या उपस्थितीची राजकीय व सामाजिक वर्तुळात चर्चा होत आहे.

### विद्यार्थ्यांच्या हक्कासाठी सातत्याने लढणारे प्रा. विठ्ठल कांगणे

विद्यार्थ्यांच्या न्याय्य हक्कांसाठी सातत्याने संघर्ष करणारे नाव म्हणून प्रा. विठ्ठल कांगणे यांची राज्यभर ओळख आहे. स्पर्धा परीक्षा, पेपरफुटी, शिक्षण व्यवस्थेतील त्रुटी आणि विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक हक्कांच्या प्रश्नांवर त्यांनी सातत्याने आवाज उठविला आहे. विविध विद्यार्थी आंदोलनांमध्ये सक्रिय सहभाग घेत शासनाचे लक्ष विद्यार्थ्यांच्या प्रश्नांकडे वेधण्याचे काम त्यांनी केले आहे. विद्यार्थ्यांशी सातत्याने संवाद साधून त्यांच्या समस्या शासनापर्यंत पोहोचविणारे मार्गदर्शक म्हणून त्यांची प्रतिमा निर्माण झाली आहे. दिल्लीतील जंतर-मंतर आंदोलनातही त्यांनी विद्यार्थ्यांच्या न्याय्य मागण्यांना पाठिंबा देत सक्रिय सहभाग नोंदविला.

## सर्वसामान्यांना महागाईच्या चक्रातून दिलासा द्यावा

इथेनॉल, हायड्रोजन आणि अवकाश संशोधनात नव्या शक्यता निर्माण होत आहेत. त्यामुळे वैज्ञानिक प्रगतीकडे राजकारणापेक्षा राष्ट्रीय विकासाच्या दृष्टीने पाहण्याची गरज आहे. ब्राझीलमध्ये ४० वर्षे इथेनॉल मिश्रित पेट्रोलचा वापर सुखेनैव चालला आहे. भारतातही २०१८ साली जाहीर झालेल्या जैवइंधन धोरणानंतर आठ वर्षे तो विनातक्रार सुरू होता. परंतु, अचानक देशाच्या राजकारणाने घेतलेल्या एका वळणात पेट्रोलमध्ये इथेनॉलचे मिश्रण टीकेचे बनले. त्यातच भारतात हायड्रोजनवर चालणार्या पहिल्या रेल्वेचा प्रवास सुरू झाला आहे. विज्ञान आणि तंत्रज्ञानातील या चमत्कारी बदलाने सर्वांच्याच भुवया उंचावल्या असल्या, तरी यापुढे भारतीयांना कोणत्या विषयाला राजकारणात स्थान द्यायचे, याचा विचारपूर्वक निर्णय घ्यावा लागणार आहे. आखातातील युद्धसंघर्ष शस्त्रसंधी करारामुळे थांबेल, या अपेक्षेने सुटकेचा निःश्र्वास टाकलेले जग पुन्हा चिंताक्रांत झाले आहे. युद्धविरामाला केराची टोपली दाखवत ८-१० दिवसांपासून पुन्हा इराण आणि अमेरिका यांच्यात घनघोर युद्ध पेटले असून ते व्यापक होत आहे. आखाती देशांत महत्प्रयासाने उभे राहिलेले जल शुद्धीकरण प्रकल्प, वीजनिर्मिती प्रकल्प, बोगदे, पूल, बंदरे या संघर्षामध्ये बेचिराख होत आहेत. ट्रम्प प्रशासनाने इराणची आर्थिक कोंडी आणखी तीव्र करण्यासाठी त्यांची सुमारे ३४४ दशलक्ष डॉलर मूल्याची क्रिप्टोकरन्सी गोठवली. यामागचा उद्देश इराणच्या फंडिंग चॅनेलला पूर्णपणे वेसण घालणे हा आहे. युद्धबंदी करारावर स्वाक्षरीनंतर १२० डॉलरपर्यंत पोहोचलेले कच्चे तेल १५ ते २३ टक्क्यांनी घसरून ७५ डॉलरवर आले होते. गॅस पुरवठाही मुबलक आणि सुरळीत सुरू होता. खरिपातील शेती पिकांना संजीवनी देणाऱ्या खतांची आवक वाढली होती. एल निनोचे भीतीचे ढग मेघदूत बनून बरसण्यास सुरुवात झाली होती. यामुळे गंडांतर टळले या भावनेने भारतीय जनमानस सुखावले होते. पण नव्याने युद्धाचा वणवा पेटल्यामुळे पुन्हा निराशेची छाया पसरली आहे. होर्मुझ सामुद्रधुनी पुन्हा बंदिस्त झाल्यामुळे जागतिक तेल वाहतुकीपुढे अडथळे निर्माण झाले आहेत. भरीस भर म्हणजे लाल समुद्रातही येमेनमधील इराण समर्थक हूती बंडखोरांनी दक्षिण भाग आणि बाब अल-मंदेब सामुद्रधुनीमध्ये व्यापारी जहाजांना लक्ष्य केल्यामुळे आंतरराष्ट्रीय जलमार्गांवर गंभीर परिणाम झाला आहे. हूतींच्या नाकेबंदीमुळे अनेक प्रमुख तेल टँकर आणि मालवाहू जहाजांना सुरक्षिततेच्या कारणास्तव हा मार्ग टाळावा लागत आहे. आता जहाजांना आफ्रिकेच्या दक्षिण टोकावरील केप ऑफ गुड होपला वळसा घालून जावे लागत असल्यामुळे प्रवास वेळेत १० ते १४ दिवसांची वाढ झाली. परिणामी मालवाहतूक खर्च वाढला. चौथ्या तिमाहीपर्यंत तेल पुरवठा युद्धपूर्व पातळीच्या ४५ टक्क्यांपेक्षा कमी राहिला, तर कच्च्या तेलाचे दर १२० डॉलर प्रति बॅरलच्या पुढे जातील, असा इशारा 'गोल्डमॅन सॅक्स'ने दिला आहे. ही वाढ ऊर्जा क्षेत्रापुरती मर्यादित न राहता महागाई, आर्थिक विकास आणि भारतासारख्या आयातदार देशांच्या वित्तीय स्थैर्यावर दूरगामी परिणाम करू शकते. चालू महिन्यामध्ये आलेले किरकोळ आणि घाऊक महागाईचे दर रिझर्व्ह बँकेच्या ४ टक्के लक्ष्यित दराच्या चौकटी मोडणारे होते. सद्य:स्थितीत ब्रेंट क्रूडच्या दरांनी ९५ डॉलरची पातळी ओलांडली आहे. याचा नकारात्मक परिणाम रुपयाची वाटचाल आणि एफपीआय प्रवाहावर होऊ शकतो. बँक ऑफ बडोदाने आपल्या अहवालात महागाई वाढण्याचे अनुमान वर्तवले आहे. लवकरच भारतात सणासुदीचा हंगाम सुरू होईल. या काळात देशातील मागणी सर्वोच्च पातळीवर असते. सणवार, व्रतवैकल्ये, गणेशोत्सव, नवरात्र, दिवाळीसारखे वर्षभरातील महत्त्वाच्या उत्सवांचे पर्व बाजारपेठेसाठी पोषक ठरते. पण अन्नधान्यासह सर्वच वस्तूंच्या किमतींमध्ये १५ ते २० टक्के वाढ झाल्यामुळे ग्राहकांच्या क्रयशक्तीवर परिणाम झाला आहे. महिनाभरात गव्हाच्या किमतींमध्ये आठ टक्क्यांहून अधिक वाढ झाली. सोयाबीन लागवड सहा टक्क्यांनी घटली असून पावसात आणखी विलंब झाल्यास प्रतिहेक्टर उत्पादनात पाच ते सात टक्के घट होईल. जागतिक बाजारात पाम तेलाची उपलब्धता कमी झाली असून भारताने आयातही कमी केली आहे. त्यामुळे देशांतर्गत साठ्यावर दबाव वाढू शकतो. सणासुदीत खाद्यतेलांची मागणी वाढते. ऑगस्टपासून बाजारातील मागणी वाढण्यास सुरुवात होईल आणि दिवाळीपर्यंत ती उच्चांक गाठेल. यामुळे किमतींवर आणखी दबाव येऊ शकतो. त्यातच जैवइंधनासाठी पाम तेलाचा वाढता वापर, सोयातेल आणि सूर्यफूल तेलाच्या जागतिक किमतींतील वाढ तसेच रुपयाच्या घसरणीमुळे वाढलेला आयात खर्च या घटकांमुळे खाद्यतेल स्वस्त होण्याची शक्यता नाही. स्वयंपाकघरातील आवश्यक वस्तू महागल्याने त्याचा फटका मध्यमवर्ग आणि अल्प उत्पन्न गटाला सोसावा लागत आहे. रुपया ९६.३६ प्रति डॉलरपर्यंत घसरल्याने आयातीचे अर्थकारण कोलमडले आहे. रिझर्व्ह बँकेच्या माध्यमातून चलन बाजारातील अस्थिरता नियंत्रित ठेवण्यासाठी प्रयत्न सुरू असले, तरी तेलाच्या वाढत्या किमती आणि परकीय बाजारातील घडामोडी भारतीय चलनावर दबाव निर्माण करतात. शेअर बाजारातील घसरण, औद्योगिक कच्चा माल ते इलेक्ट्रॉनिक उपकरणांपर्यंत रुपयाच्या घसरणीचे परिणाम दिसून येतात. कंपन्यांना वाढता उत्पादन खर्च भरून काढण्यासाठी उत्पादनांच्या किमतीत वाढ करणे भाग पडते. परिणामी पुन्हा चलनवाढीस हातभार लागतो. महागाईचे हे दुष्टचक्र भेदल्याशिवाय आर्थिक विकासाचा गाडा सुचारू पद्धतीने पुढे सरकत नाही. ही सर्व स्थिती बऱ्याच अंशी जागतिक घडामोडींवर अवलंबून असल्याने केवळ भारतच नव्हे सर्वच विकसनशील देश, विकसित देश यामध्ये होरपळून निघत आहेत. दुर्दैवाने ना अमेरिकेला याची फिकीर आहे, ना इराणला. इराण आपल्या मदतीसाठी धावून येण्यास तयार आहे; पण अमेरिकेची धोरणे भारताच्या विकासाला हातभार लावण्याऐवजी अडचणी वाढवणारी आहेत. डोनाल्ड ट्रम्प यांनी औषधांच्या आयातीवर अतिरिक्त टॅरिफची घोषणा केल्याने भारतीय औषध उद्योग अडचणीत आला. निर्यातीतील संकटे, वाढलेला उत्पादन खर्च, आयातीचा वाढीव खर्च, आक्रसलेली क्रयशक्ती आणि चलनवाढ यामुळे देशातील उद्योगविश्र्व अडचणीत आहे. केंद्र सरकार आणि आरबीआयने संयुक्तरीत्या या संकटावर मात करण्यासाठी धोरणात्मक उपाययोजना करणे गरजेचे आहे. आरबीआयने मागील पतधोरणात रेपो दर ५.२५ टक्क्यांवर स्थिर ठेवत 'वेट अँड वॉच'ची भूमिका घेतली होती. कारण व्याज दर वाढविल्यास महागाईवर काही प्रमाणात नियंत्रण मिळू शकते; मात्र उद्योगांना कर्ज महाग होते, गुंतवणुकीचा वेग कमी होतो आणि आर्थिक वाढीवर परिणाम होऊ शकतो. दुसरीकडे, व्याज दर स्थिर ठेवल्यास विकासाला चालना मिळू शकते; परंतु महागाई नियंत्रणाबाहेर जाण्याचा धोका वाढतो. त्यामुळे महागाई आणि विकास यांच्यात समतोल राखणे ही रिझर्व्ह बँकेपुढील मोठी कसोटी असणार आहे. सर्वांत मोठा प्रश्र्न इराण आणि अमेरिकेत नव्याने समेट कोण घडवून आणणार हा आहे. संयुक्त राष्ट्रे बघ्याची भूमिका सोडण्यास तयार नसल्याने या युद्धाचा शेवट कधी आणि कसा होणार, हा कळीचा प्रश्र्न अनुत्तरित आहे. भविष्यकाळ बिकट बनवणाऱ्या या संकटांमुळे सरकारची अग्निपरीक्षा असणार आहे. सर्वसामान्यांना महागाईच्या चक्रातून दिलासा मिळेल अशी धोरणे आखणे गरजेचे आहे. अन्यथा मागणीपासून बचतीपर्यंत सर्वच गोष्टी प्रभावित होऊन आर्थिक मंदीचा फेरा येऊ शकतो.

# नीती आयोगाच्या शाश्वत विकास उद्दिष्टांच्या निर्देशांकांमध्ये महाराष्ट्राने विभागनिहाय आणि परिणामाधारित नियोजन करावे - मुख्यमंत्री फडणवीस

## मुख्यमंत्री यांच्या अध्यक्षतेखाली नीती आयोगाच्या शाश्वत विकास निर्देशांकांचा आढावा

**दैनिक आपला विदर्भ**

**मुंबई । प्रतिनिधी :** नीती आयोगाने मानवी जीवनावर परिणाम करणाऱ्या विविध निर्देशांकावर राज्यांमध्ये विकासात्मक स्पर्धा सुरू केली आहे. शाश्वत विकास उद्दिष्टांमधील (एसडीजी) सर्वच निर्देशांकांमध्ये महाराष्ट्राने देशात अव्वल स्थान मिळवावे यासाठी पुढील चार वर्षांसाठी विभागनिहाय आणि परिणामाधारित नियोजन करावे असे निर्देश मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिले. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी शासनाने आकांक्षित म्हणून जाहीर केलेले १० जिल्हे व १७७ तालुक्यांमध्ये निती आयोगाचे निर्देशांकानुसार मोठ्या प्रमाणात विकासाची कामे करून महाराष्ट्राला सर्वात पुढे ठेवण्याचे आवाहन केले. सामाजिक क्षेत्र वॉर रूम अंतर्गत नीती आयोगाच्या शाश्वत विकास निर्देशांक उद्दिष्टांमधील १७ निर्देशांकांबाबत राज्याच्या प्रगतीचा विस्तृत आढावा मुख्यमंत्री फडणवीस यांनी सह्याद्री अतिथीगृह येथे आयोजित बैठकीत घेतला. यावेळी मुख्यमंत्री कार्यालयाचे यांचे प्रधान सचिव श्रीकर परदेशी यांनी सादरीकरणाद्वारे माहिती दिली.

गेल्या काही वर्षांत महाराष्ट्र शाश्वत विकास उद्दिष्टांच्या दिशेने महत्त्वपूर्ण वाटचाल करत आहे. महाराष्ट्राची क्षमता लक्षात घेता २०३० पर्यंत अधिक वेगाने वाटचाल करण्यासाठी नीती आयोगाच्या विविध निर्देशांकांमध्ये अधिक परिणामकारकपणे काम करण्याची गरज आहे. पुढील चार वर्षे राज्याच्या विकासासाठी निर्णायक असून या काळात योजनांचे पुनर्रचना व बळकटीकरण करावे. या कालावधीत ठोस नियोजन करून महाराष्ट्राला शाश्वत विकास उद्दिष्टांमध्ये देशात अव्वल आणण्यासाठी सर्व विभागांनी एकत्रितपणे प्रयत्न करावेत, असे निर्देश मुख्यमंत्र्यांनी यावेळी दिले. आगामी अर्थसंकल्पीय नियोजन शाश्वत विकास निर्देशांकाच्या उद्दिष्टांच्या पूर्ततेला गती देण्यासाठी उपयोगात आणावे, असेही त्यांनी यावेळी सांगितले.

**रिअल टाइम डेटा महत्वाचा**

मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले, विभागाने आपल्याशी सबंधित निर्देशांकाचा अभ्यास करून प्रगती साधण्यासाठी कार्यपद्धती, धोरणांमध्ये सुधारणा कराव्यात. अग्रक्रमाच्या राज्यांमधील सर्वोत्तम कार्यपद्धती, संकल्पना, धोरणांचा अभ्यास करून राज्याची कामगिरी उंचावण्यावर भर द्यावा. शासन यंत्रणा अधिक सक्षम करण्यासाठी विभागांनी 'रिअल टाइम डेटा'चे संकलन करून त्यावर विश्लेषणात्मक व अन्य राज्यांच्या निर्देशांकासोबत तुलनात्मक अभ्यास करावा. राज्यामध्ये डेटा संकलित करण्याची अधिक मजबूत करण्यात यावी. योजनांच्या अंमलबजावणीचे सतत मूल्यमापन करून तत्काळ आवश्यक सुधारणा करण्यात याव्यात.

काही निर्देशांकांमध्ये राज्याच्या प्रत्यक्ष परिस्थितीपेक्षा उपलब्ध आकडेवारी वेगळी चित्र दाखवत असल्यास डेटा गॅप शोधून काढणे आवश्यक आहे. त्यासाठी दुय्यम डेटासोबतच प्राथमिक आणि रिअल टाइम डेटा संकलनाची व्यवस्था अधिक सक्षम करावी. उपलब्ध विविध डेटाबेसचे विश्लेषण करून कोणत्या भागात किंवा कोणत्या क्षेत्रात मागे आहोत, हे ओळखून त्यानुसार तातडीने उपाययोजना करणे आवश्यक आहे, असे मुख्यमंत्र्यांनी सांगितले.




**परिणाम केंद्रीत कार्यपद्धती असावी**

मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले की, आरोग्य विभागाच्या माध्यमातून उपचारांची व्यवस्था करण्यात येते. मात्र या व्यवस्थेवर नियंत्रण ठेवून व्यवस्थेपूर्वी असलेली उपचार घेत असलेली रुग्णसंख्या आणि व्यवस्थेनंतरची रुग्णसंख्या, मिळणारे लाभ अशा परिणामकेंद्रीत (आउट कम बेसिस) पद्धतीवर आधारित कार्यवाही करावी. त्याचबरोबर आरोग्य, शिक्षण, पायाभूत सुविधा आणि सामाजिक विकास

क्षेत्रातील प्रत्यक्ष बदल मोजून धोरणांमध्ये सुधारणा करावी. परिणाम आणि प्रभाव यावर आधारित प्रशासनाची कार्यसंस्कृती विकसित केली जावी. राज्याकडे निधी, मनुष्यबळ आणि प्रशासकीय क्षमतेच्या स्वरुपात विपुल संसाधने उपलब्ध आहेत. या सर्व संसाधनांचा अधिक प्रभावी वापर करून नागरिकांच्या जीवनमानात सुधारणा घडवून आणण्यावर भर दिला जावा. सध्याची धोरणे आणि कार्यपद्धती यांच्या अंमलबजावणीमधील कमतरता, त्रुटी शोधून त्या दूर करण्यासाठी प्रयत्न करावेत. ज्या क्षेत्रातील निर्देशांकामध्ये राज्य पुढे आहे, त्या क्षेत्राच्या प्रगतीमध्ये सातत्य ठेवावे, अशा सूचनाही मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिल्या.

निती आयोगाने दिलेले शाश्वत विकास निर्देशांक (एसडीजी) डोळ्यासमोर ठेवून विकासाचे नियोजन करावे. निती आयोगाचा हा राज्याच्या प्रगतीचा आरसा समजावा. नीती आयोगाने दिलेल्या निर्देशांकातील प्रगतीचा आढावा यापुढे दर तीन महिन्यांनी घेण्यात यावा. तसेच मुख्य सचिव यांच्या स्तरावरही नियमित निरीक्षण केले जावे, अशी अपेक्षाही मुख्यमंत्र्यांनी यावेळी व्यक्त केली. राज्याच्या आकांक्षित क्षेत्रात झालेल्या गुंतवणुकीतून होणाऱ्या परिणामांचा नियमित आढावा घेतला पाहिजे. एसडीजी उद्दिष्टांवरील कामगिरी ही सर्व अधिकाऱ्यांच्या अपार प्रणालीत प्रमुख कामगिरी निर्देशांक (केपीआय) अनिवार्य करण्यात यावा असे मुख्यमंत्री फडणवीस यांनी सांगितले.

**चांगली कामगिरी करणाऱ्या क्षेत्रांची कामगिरी कायम ठेवा**

ऊर्जा, शाश्वत शहरे आणि अन्य काही क्षेत्रांमध्ये महाराष्ट्राची कामगिरी चांगली असून त्यामध्ये सातत्य ठेवावे. तसेच ज्या क्षेत्रांमध्ये राज्य मागे पडलेले आहे, त्या क्षेत्रांतील त्रुटी शोधून त्यावर लक्ष केंद्रित करावे. प्रत्येक विभागाने आपल्या निर्देशांकांवर सखोल काम करून डेटा विश्लेषण करावे, असे निर्देशही मुख्यमंत्र्यांनी यावेळी दिले. या बैठकीला मुख्य सचिव राजेश अग्रवाल यांच्यासह पोलीस महासंचालक सदानंद दाते, मुख्यमंत्र्यांचे अपर मुख्य सचिव लोकेश चंद्रा तसेच सर्वच विभागांचे अपर मुख्य सचिव, प्रधान सचिव, सचिव, सेंटर फॉर इफेक्टिव्ह गव्हर्नन्स ऑफ इंडियन स्टेट्सचे अध्यक्ष तथा मुख्य कार्यपालन अधिकारी शंकर नारायणन, सदस्य विनी महाजन, आलिशा लकडावाला आदी यावेळी उपस्थित होते.

# महाराष्ट्राला १ ट्रिलियन डॉलर अर्थव्यवस्था बनविण्यासाठी मोठी झेप

## महाराष्ट्र शासन आणि जैन चार्टर्ड अकाउंटंट्स फेडरेशन यांच्यात सामंजस्य करार

**मुंबई । प्रतिनिधी :** महाराष्ट्राला १ ट्रिलियन डॉलर अर्थव्यवस्था बनविण्याच्या राज्य शासनाच्या महत्त्वाकांक्षी उद्दिष्टाला गती देण्यासाठी महाराष्ट्र शासनाच्या थेट परकीय गुंतवणूक, अनिवासी भारतीय व राजशिष्टाचार विभाग आणि जैन चार्टर्ड अकाउंटंट्स फेडरेशन (जेसीएएफ) यांच्यात सामंजस्य करारावर स्वाक्षरी करण्यात आली. या कराराच्या माध्यमातून राज्यात थेट परकीय गुंतवणूक (एफडीआय) आकर्षित करणे, भांडवल उभारणीला चालना देणे, ज्ञानाची देवाणघेवाण वाढविणे तसेच जागतिक गुंतवणूकदारांशी संपर्क अधिक मजबूत करण्यासाठी प्रभावी व्यासपीठ उपलब्ध होणार आहे.

या भागीदारीमुळे महाराष्ट्रातील उद्योग, पायाभूत सुविधा आणि विविध विकास क्षेत्रांमध्ये गुंतवणुकीच्या नव्या संधी निर्माण होण्यास मदत होणार आहे.

करारानुसार जैन चार्टर्ड अकाउंटंट्स फेडरेशन आपल्या जागतिक संस्थात्मक, कॉर्पोरेट, अनिवासी भारतीय, आर्थिक व शैक्षणिक नेटवर्कच्या माध्यमातून महाराष्ट्रातील विविध क्षेत्रांमध्ये परकीय गुंतवणूक आकर्षित करण्यासाठी सक्रिय भूमिका बजावणार आहे. तसेच जागतिक गुंतवणूकदारांना भारतातील कररचना, फेमा, कंपनी कायदे आणि अन्य कायदेशीर बाबींविषयी तांत्रिक मार्गदर्शन व सल्लागार सेवा उपलब्ध करून देण्यात येणार आहेत.



याबरोबरच महाराष्ट्र शासन आणि जेसीएएफ यांच्या संयुक्त विद्यमाने देशांतर्गत तसेच आंतरराष्ट्रीय स्तरावर गुंतवणूकदार गोलमेज परिषदा, कार्यशाळा आणि जागतिक गुंतवणूकदार मेळाव्यांचे आयोजन करण्यात येणार आहे. राज्य शासनाचा थेट परकीय गुंतवणूक विभाग जेसीएएफमार्फत येणाऱ्या गुंतवणूकदारांना आवश्यक धोरणात्मक व प्रशासकीय सहकार्य उपलब्ध करून देणार आहे.

या सामंजस्य करारावर महाराष्ट्र शासनातर्फे थेट परकीय गुंतवणूक, अनिवासी भारतीय व राजशिष्टाचार विभागाचे सचिव डॉ. राजेश गवांदे आणि जैन चार्टर्ड अकाउंटंट्स फेडरेशनतर्फे अध्यक्ष (अॅपेक्स) सीए शांतीलाल कोचर यांनी स्वाक्षऱ्या केल्या. यावेळी उपसचिव क्रांती पाटील, अवर सचिव अविनाश सोलवट, उपमुख्यमंत्री कार्यालयाचे सहसचिव व धोरणात्मक सल्लागार डॉ. संतोष भोसले तसेच जैन चार्टर्ड अकाउंटंट्स फेडरेशनचे पदाधिकारी आणि मान्यवर उपस्थित होते.

## पुन्हा नवे रोमँटिक ट्रॅक मधोश! यश-तारा सुतारियाची जबरदस्त केमिस्ट्री तर नयनताराचीही खास झलक

**मुंबई । प्रतिनिधी :** यशच्या बहुचर्चित 'टॉक्सिक' चित्रपटातील दुसरे गाणे 'मधोश' रिलीज झाले असून, यात यश आणि तारा सुतारियाची रोमँटिक केमिस्ट्री प्रेक्षकांच्या पसंतीस उतरली आहे. पहिल्या 'तबाही' गाण्याच्या तुलनेत 'मधोश' अधिक भावनिक आणि संथ रोमँटिक ट्रॅक आहे.

टॉक्सिकमधील मधोश गाणे प्रदर्शित झाले असून यामध्ये साऊथ सुपरस्टार यश आणि बॉलिवूड दीवा तारा सुतारियाची रोमँटिक केमिस्ट्री चाहत्यांच्या पसंतीस उतरलीय. हे एक रोमँटिक ट्रॅक आहे. तेरी नजरों से नजरें मिलें, क्या बदलने लगा, ये... असे गाण्याचे बोल आहेत. घरी परतल्यानंतर सर्वात कठीण काळ, अमिताभ यांची प्रकृतीबाबत मोठी माहिती; शस्त्रक्रियेनंतर खउण मध्ये उपचार

या गाण्याला तनिष्क बागची, फहीम अब्दुल्ला आणि अर्सलान निजामी यांनी संगीत दिले आहे, तर सिद्धार्थ बसुरूरने आपला आवाज दिला आहे. या गाण्याची सोशल मीडियावर जोरदार चर्चा सुरू आहे. क्शन आणि डार्क वातावरणाची झलक दाखवणाऱ्या पहिल्या 'तबाही' गाण्यानंतर आता 'मधोश'मधून चित्रपटातील प्रेमकथेची आणखी एक वेगळी बाजू समोर आली आहे.

यश आणि तारा सुतारियाची प्रेमकहाणी

मधोशमध्ये यश आणि तारा सुतारिया यांच्यातील कोमल आणि हळूवार नात्याची झलक पाहायला मिळते. चित्रपटात यश 'राया', तर तारा 'रेबेका'ची भूमिका साकारत आहे. गाण्यातील दोघांचे भावनिक क्षण कॅमेराबद्ध करण्यात आले आहेत. तबाही या पहिल्या गाण्याच्या तुलनेत 'मधोश'चा अंदाज अधिक शांत, हळवा.

याआधी रिलीज झालेल्या 'तबाही' गाण्यात कियारा अडवाणीसोबत चित्रपटात नात्याची एक वेगळी झलक दाखवण्यात आली होती. गीतू मोहनदास दिग्दर्शित 'टॉक्सिक' हा चित्रपट २६ ऑगस्ट २०२६ रोजी जगभरात हा चित्रपट रिलीज होणार आहे. यशचा केजीएफ चॅप्टर २ नंतरचा हा पहिलाच चित्रपट असून, त्यात क्शन, रोमान्स आणि थरार पाहायला मिळणार आहे. दुसरीकडे, नयनतारा यशसोबत सिगारेट ओढताना आणि क्षितिजाकडे पाहताना दिसते. दरम्यान, साऊथ स्टार यश नितेश तिवारी यांच्या 'रामायण' चित्रपटात रावणच्या भूमिकेतही झळकणार आहे.

# दिवंगत उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या पूर्णाकृती पुतळ्याचे उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजित पवार यांच्या हस्ते लोकार्पण

**दैनिक आपला विदर्भ**

**बारामती । प्रतिनिधी :** दिवंगत उपमुख्यमंत्री अजित अनंतराव पवार यांच्या पूर्णाकृती ब्राँझ पुतळ्याचे उपमुख्यमंत्री तथा जिल्ह्याच्या पालकमंत्री सुनेत्रा अजित पवार यांच्या हस्ते नटराज नाट्य कला मंडळ, तिरंगा सर्कल येथे लोकार्पण करण्यात आले. यावेळी उपमुख्यमंत्री श्रीमती पवार यांनी पुतळ्यास पुष्प अर्पण करून अभिवादन केले.

याप्रसंगी जिल्हा परिषदेचे अध्यक्ष वीरधवल जगदाळे, नगराध्यक्ष सचिन सातव, उपविभागीय अधिकारी उत्तम दिघे, एमआयडीसीचे प्रादेशिक अधिकारी हनुमंत पाटील, उपविभागीय पोलीस अधिकारी चैतन्य कदम, सार्वजनिक बांधकाम विभागाचे कार्यकारी अभियंता अमोल पवार, जलसंपदा विभागाचे कार्यकारी अभियंता दिगंबर



डुबल, तहसीलदार स्वप्नील रावडे, गटविकास अधिकारी किशोर माने, मुख्याधिकारी पंकज भुसे, माजी ज्येष्ठ नगरसेवक किरण गुजर, पवार कुटुंबीय तसेच विविध क्षेत्रातील मान्यवर, स्थानिक लोकप्रतिनिधी उपस्थित होते. कार्यक्रमानंतर उपमुख्यमंत्री श्रीमती पवार यांच्या हस्ते दिवंगत उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या जीवनावर आधारित छायाचित्र दालनाचे लोकार्पण करण्यात आले. त्यांनी या दालनाला भेट देऊन छायाचित्रांची पाहणी केली. पोलीस बँड पथकाच्यावतीने पुतळ्यास मानवंदना देण्यात आली. दिवंगत उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या अभिवादनाप्रित्यर्थ सर्वधर्मीय प्रार्थना घेण्यात आली. तसेच निलिमा नृत्य विद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी गीत वदंना सादर केली.

DAINIK AAPLA VIDHARBH-Printed by Rameshwar Vishwanath Sakalkar & Published by DEVIDAS MADHAVRAO KHANPATE Printed at Shubham printing press near tahsil office Mehkar-443301 (M.S.) and Published at mehkar- malegaon road near polics Station Dongaon Dist. Buldana-443301 (Mah.) Editor DEVIDAS MADHAVRAO KHANPATE Mob.No.97672 33034 Title-Code:- MAHMAR52707

हे पत्र प्रकाशक, मालक देविदास माधवराव खनपटे यांनी शुभम प्रिंटिंग प्रेस तहसील कार्यालयाजवळ मेहकर जि. बुलडाणा-४४३३०१ (महा) येथे छापून मेहकर मालेगाव रोड पोलीस स्टेशन समोर डोणगाव, जि. बुलडाणा-४४३३०१ (महा) येथून प्रकाशित केले. मुद्रक रामेश्वर विश्वनाथ साकळकर, संपादक-देविदास माधवराव खनपटे मोबा.९७६७२ ३३०३४ पीआरबी कायद्यानुसार छापलेल्या मताशी सहमत असेलच असे नाही, वादविवाद फक्त मेहकर न्यायालया अंतर्गत, (टिप: प्रकाशित

# चरणसेवाने जपले लाखो वारकऱ्यांचे आरोग्य

## ४.९६ लाखांहून अधिक वारकऱ्यांना लाभ







दैनिक आपला विदर्भ

**मुंबई । प्रतिनिधी :** गेल्या पंधरा दिवसांपासून सुरू असलेल्या चरणसेवा उपक्रमाचा समारोप शुक्रवार, दि. २४ जुलै रोजी होणार आहे. राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या संकल्पनेतून मुख्यमंत्री सहाय्यता निधी व धर्मादाय रुग्णालय मदत कक्षामार्फत लोकसहभागातून हा उपक्रम राबविण्यात आला. यंदाच्या आषाढी वारीत राज्यातील १४ जिल्ह्यांतील ४ लाख ९६ हजारांहून अधिक वारकऱ्यांनी थेट चरणसेवा आणि आरोग्यसेवेचे लाभ घेतला.

आषाढी वारीदरम्यान वारकऱ्यांना होणारा शारीरिक ताण, स्नायूदुखी, पायांना येणारे फोड, थकवा तसेच पावसाळ्यातील संसर्गजन्य आजारांचा धोका लक्षात घेऊन हा उपक्रम राबविण्यात आला. मागील वर्षी सात जिल्ह्यांमध्ये सुरू झालेल्या या उपक्रमाचा यंदा विस्तार करून तो दिंडी मार्गावरील १४ जिल्ह्यांमध्ये राबविण्यात आला.

**या चौदा जिल्ह्यांत उपक्रम**

सातारा, पुणे, सोलापूर, नाशिक, बुलढाणा, अकोला, जालना, बीड, नांदेड, छत्रपती संभाजीनगर, वाशिम, सांगली, अमरावती आणि अहिल्यानगर या जिल्ह्यांतील १४० मुक्कामस्थळांवर सेवा केंद्रे उभारण्यात आली. या केंद्रांमधून वारकऱ्यांना चरणसेवा, मोफत आरोग्य तपासणी, फिजिओथेरपी, प्रथमोपचार, आवश्यक औषधांचे वितरण, रुग्णवाहिका सुविधा तसेच गरजेनुसार पुढील उपचारांची व्यवस्था उपलब्ध करून देण्यात आली.

**३ हजार लिटर आयुर्वेदिक औषधी तेलाचा वापर**

या उपक्रमात १६४ आरोग्य संस्थांनी सहभाग घेतला. ७ हजार ५३८ स्वयंसेवक तसेच ११ हजार ३३१ डॉक्टर, वैद्यकीय प्रशिक्षणार्थी विद्यार्थी आणि आरोग्य कर्मचाऱ्यांनी सेवाकार्यात योगदान दिले. सेवेसाठी १० हजार टी-शर्ट आणि ३ हजार लिटर आयुर्वेदिक औषधी तेलाचा उपयोग चरणसेवेसाठी करण्यात आला. तसेच ८ रथांद्वारे जनजागृती करण्यात आली. लोकसहभागातून साकारण्यात आलेल्या या उपक्रमातून तब्बल ४ लाख ९६ हजारांहून अधिक वारकऱ्यांना प्रत्यक्ष चरणसेवा आणि आरोग्यसेवा उपलब्ध करून देण्यात आली.

**दिंडीत अवयव दानावर जनजागृती**

उपचारांबरोबरच आरोग्य जनजागृतीलाही विशेष महत्त्व देण्यात आले. आरोग्य जनजागृती रथांद्वारे स्वच्छता, सुरक्षित पिण्याचे पाणी, संसर्गजन्य आजारांपासून बचाव, रक्तदान, अवयवदान संदर्भात जनजागृती, निरोगी जीवनशैली तसेच केंद्र व राज्य शासनाच्या विविध आरोग्य योजनांची माहिती वारकऱ्यांपर्यंत आरोग्य रथाच्या माध्यमातून पोहोचविण्यात आली

> राज्यातील १४ जिल्ह्यांमध्ये ४ लाख ९६ हजारांपेक्षा अधिक वारकऱ्यांपर्यंत चरणसेवा पोहोचविता आली, याचा आनंद आहे. या उपक्रमाच्या यशामागे लोकसहभाग हीच सर्वात मोठी ताकद ठरली. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या संकल्पनेला विविध आरोग्य संस्था, दानशूर व्यक्ती, डॉक्टर, वैद्यकीय प्रशिक्षणार्थी विद्यार्थी, आरोग्य कर्मचारी आणि हजारो स्वयंसेवकांनी दिलेल्या मोलाच्या सहकार्यामुळे हे सेवाकार्य यशस्वी झाले.
>
> **– रामेश्वर नाईक**
> **कक्ष प्रमुख, मुख्यमंत्री सहाय्यता निधी व धर्मादाय रूग्णालय मदत कक्ष**

## महत्त्वाचे...

### क्षणात झाला चुराडा! भरधाव टेम्पोची तीन दुचाकींना जोरदार धडक





दैनिक आपला विदर्भ

**भिवंडी । प्रतिनिधी :** भिवंडी शहरातील अजय नगर परिसरात भरधाव वेगाने आलेल्या पिकअप टेम्पोने रस्त्याच्या कडेला गॅरेजसमोर उभ्या असलेल्या तीन दुचाकींना जोरदार धडक दिली. या धडकेत तीन दुचाकींचे मोठे नुकसान झाले असून गॅरेजसमोरील पत्र्याचे शेडही कोसळले. सुदैवाने घटना घडली त्यावेळी गॅरेजमध्ये कोणताही कर्मचारी उपस्थित नसल्याने मोठी जीवितहानी टळली.

मिळालेल्या माहितीनुसार, भरधाव वेगाने आलेल्या पिकअप टेम्पोवरील चालकाचे वाहनावरील नियंत्रण सुटल्याने हा अपघात घडला. धडकेमुळे तीन दुचाकींचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले असून गॅरेजसमोरील शेडही जमीनदोस्त झाले.

घटनेनंतर परिसरात एकच गोंधळ उडाला. नागरिकांनी तातडीने निजामपूरा पोलिसांना माहिती दिली. पोलिसांनी घटनास्थळी धाव घेत चालकाला ताब्यात घेतले असून त्याची चौकशी सुरू आहे.

### वंचितची महाराष्ट्र बंदची हाक! अकोल्यात जोरदार प्रतिसाद; शाळा, महाविद्यालयांसह बाजारपेठा स्वयंस्फूर्तीने बंद

दैनिक आपला विदर्भ

**अकोला । प्रतिनिधी :** दिल्ली येथील विद्यार्थ्यांच्या आंदोलनावर लाठीमार प्रकरणाचा निषेध म्हणून वंचित बहुजन आघाडीने गुरुवारी महाराष्ट्र बंदची हाक दिली आहे. वंचितच्या या बंदला अकोला जिल्ह्यात प्रतिसाद मिळाला. काही खासगी शाळा व महाविद्यालयांनी विद्यार्थ्यांची सुरक्षा लक्षात घेता बंद ठेवण्याचा निर्णय घेतला. वंचितच्या पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी शहरातील प्रमुख मार्गावरून फेरी काढत बंदचे आवाहन केले. त्याला प्रतिसाद देत बाजारपेठेमध्ये व्यापाऱ्यांनी दुकाने बंद ठेवली आहेत.

नीट पेपरफुटी प्रकरणांची निष्पक्ष व उच्चस्तरीय चौकशी करून दोषींवर कठोर कारवाई करावी, तसेच नैतिक जबाबदारी म्हणून केंद्रीय शिक्षणमंत्री धर्मेंद्र प्रधान यांनी राजीनामा देण्याच्या मागणीसाठी दिल्ली येथील जंतर-मंतर मैदान येथे आंदोलन करणाऱ्या विद्यार्थ्यांवर अमानुष लाठीमार करण्यात आला. यामध्ये असंख्य विद्यार्थी जखमी झाले. दिल्ली येथील घटनेचे तीव्र पडसाद अकोल्यात उमटले आहेत. या घटनेच्या निषेधार्थ वंचित बहुजन आघाडीचे राष्ट्रीय अध्यक्ष ॲड. प्रकाश आंबेडकर यांनी महाराष्ट्र बंदची हाक दिली. वंचितचा बालेकिल्ला म्हणून ओळखल्या जाणाऱ्या अकोला जिल्ह्यात बंदला स्वयंस्फूर्तीने प्रतिसाद मिळत आहे.

वंचित आघाडीने पुकारलेला बंद यशस्वी करण्यासाठी आज सकाळपासून पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी प्रयत्न चालवले आहेत. शहरातील प्रमुख मार्गावरून फेरी काढून वंचितच्या पदाधिकाऱ्यांनी व्यापाऱ्यांना बंदमध्ये सहभागी होण्याचे आवाहन केले. तुमच्या मुलांच्या भविष्यासाठी हा बंद पुकारण्यात आल्याचे पदाधिकाऱ्यांकडून व्यापाऱ्यांना सांगण्यात येत आहे. अनेक व्यापाऱ्यांनी स्वयंस्फूर्तीने बंदमध्ये सहभाग घेऊन आपली दुकाने बंद ठेवली. या पार्श्वभूमीवर शहरातील काही खासगी शाळा व महाविद्यालयांनी विद्यार्थ्यांची सुरक्षा लक्षात घेता बंदमध्ये सहभाग घेतला. या संदर्भात पालकांना अगोदरच संदेश पाठविण्यात आले होते. अनुदानित व इतर शाळा सुरू आहेत.

'वंचित'च्या महाराष्ट्र बंदला अकोला जिल्ह्यात शिवसेना ठाकरे गटासह विविध संघटनांनी पाठिंबा दिला. यामध्ये युवा समिती, महाराष्ट्र शेतकरी संघटना, कुणबी समाज मंडळ, जिल्हा बिल्डिंग पेंटर्स बांधकाम मजुर असोसिएशन, छावा, कुंभार समाज विकास परिषद, संभाजी ब्रिगेड, डाटा आदींसह विविध संघटनांचा सहभाग आहे.

### अंबरनाथ हादरले! लिव्ह-इन पार्टनरकडून ७ वर्षांच्या चिमुकल्याची हत्या, आरोपीला कोठडी

**अंबरनाथ । प्रतिनिधी :** लिव्ह-इन रिलेशनशिपमध्ये अडसर ठरत असल्याच्या रागातून एका तरुणाने आपल्या प्रेयसीच्या सात वर्षांच्या मुलाला बेदम मारहाण केल्याची अत्यंत धक्कादायक घटना अंबरनाथमध्ये उघडकीस आली आहे. या अमानुष मारहाणीत गंभीर जखमी झालेल्या या निष्पाप बालकाचा मुंबईतील रुग्णालयात उपचारादरम्यान दुर्दैवी मृत्यू झाला. याप्रकरणी अंबरनाथ पोलिसांनी नराधम आरोपीला अटक केली असून त्याला न्यायालयाने पोलीस कोठडी सुनावली आहे. अंबरनाथ पश्चिमेकडील लादी नाका परिसरात ही संतापजनक घटना घडली आहे. या प्रकरणातील २८ वर्षीय फिर्यादी महिला सकिना इनाम कुरेशी या आपल्या पतीपासून विभक्त झाल्या होत्या.

# धक्कादायक! डोळ्यात लिंबू पिळून विवाहितेचा छळ; माहेराहून पैसे आणण्यासाठी अमानुष अत्याचार

दैनिक आपला विदर्भ

**बीड । प्रतिनिधी :** बीड जिल्ह्यातील परळी येथे विवाहितेच्या छळाची गंभीर घटना समोर आली आहे. फर्निचर खरेदीसाठी माहेरहून २ लाख रुपये आणण्याची मागणी करत पती आणि सासरच्या मंडळींकडून शारीरिक व मानसिक त्रास दिल्याचा आरोप एका ३६ वर्षीय महिलेने केला आहे. या प्रकरणी महिलेच्या तक्रारीवरून परळी शहर पोलिसांनी पती, सासू, सासरे, नणंद आणि नणंदेच्या पतीविरुद्ध गुन्हा दाखल केला असून पुढील तपास सुरू आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, संबंधित महिलेचा विवाह एप्रिल २०२३ मध्ये नांदेड येथील युवकासोबत झाला होता. लग्नानंतर सुरुवातीला संसार सुरळीत सुरू होता. मात्र काही महिन्यांनंतर पतीने पत्नीवर संशय घेण्यास सुरुवात केल्याचा आरोप तिने केला आहे. किरकोळ कारणांवरून मारहाण करणे, घरात कोंडून ठेवणे, अपमानास्पद बोलणे आणि सतत मानसिक दबाव टाकणे, असा त्रास होत असल्याचे तक्रारीत नमूद करण्यात आले आहे.

महिलेने आपल्या तक्रारीत आणखी गंभीर आरोप केले आहेत. सासरच्या मंडळींचा अंधश्रद्धेवर विश्वास असल्याने तिला अशा प्रकारचे उपचार करणाऱ्या व्यक्तींकडे नेण्यात येत होते. त्यावेळी तिच्या डोळ्यांत लिंबू पिळण्यात आल्याचा तसेच विविध प्रकारे त्रास दिल्याचा आरोप तिने केला आहे. गरोदरपणातही जबरदस्तीने औषधांच्या गोळ्या दिल्याचा दावा तिने केला आहे.

याशिवाय, मुलाचा ताबा घेण्याची धमकी देणे, ''तुला घटस्फोटही देणार नाही आणि दुसरे लग्नही करू देणार नाही,'' असे सांगून सतत मानसिक छळ करण्यात आल्याचेही महिलेने म्हटले आहे.

या प्रकरणात सुरुवातीला महिला समुपदेशन केंद्रामार्फत दोन्ही बाजूंमध्ये समेट घडवून आणण्याचा प्रयत्न करण्यात आला होता. मात्र तो यशस्वी न झाल्याने महिलेने पोलिसांकडे तक्रार दाखल केली.

महिलेच्या तक्रारीच्या आधारे परळी शहर पोलिसांनी संबंधित ५ जणांविरुद्ध विविध कलमान्वये गुन्हा नोंदवला आहे. या प्रकरणाचा अधिक तपास सुरू असून सर्व आरोपांची पडताळणी केली जात असल्याची माहिती पोलिसांनी दिली आहे.

### गंगापूर धरणातून विसर्गात वाढ; आता १२,६०० क्यूसेक्स पाण्याचा विसर्ग

दैनिक आपला विदर्भ

**नाशिक । प्रतिनिधी :** गंगापूर धरणातून सुरू असलेल्या पाण्याच्या विसर्गात वाढ करण्यात आली असून, गुरुवार (२३ जुलै) सकाळी ११ वाजल्यापासून विसर्ग ६,३५४ क्यूसेक्सवरून ७,४१३ क्यूसेक्स करण्यात आला होता. दरम्यान हा विसर्ग आता १ वाजता १२,६०० करण्यात आला आहे. नाशिक पाटबंधारे विभागाच्या पूर नियंत्रण कक्षाने याबाबत सतर्कतेचा इशारा जारी केला आहे.

पाटबंधारे विभागाने दिलेल्या माहितीनुसार, सकाळी १ वाजता १२,६०० क्यूसेक्सने विसर्ग वाढविण्यात आला आहे. तसेच, परिसरातील पावसाचे प्रमाण लक्षात घेता पुढील काळात विसर्गात आणखी वाढ होण्याची शक्यता नाकारता येत नसल्याचेही प्रशासनाने स्पष्ट केले आहे. यामुळे गोदावरी नदीपात्रालगत राहणाऱ्या नागरिकांनी विशेष सतर्कता बाळगावी, नदीपात्रात उतरू नये तसेच नदीकाठावर ठेवलेले साहित्य, जनावरे आणि इतर वस्तू तातडीने सुरक्षित ठिकाणी हलवाव्यात, असे आवाहन करण्यात आले आहे.

महानगरपालिका, जिल्हा प्रशासन तसेच संबंधित विभागांना आवश्यक ती खबरदारी घेण्याच्या सूचना देण्यात आल्या असून, नागरिकांनी प्रशासनाच्या सूचनांचे पालन करून कोणताही धोका पत्करू नये, असे आवाहन नाशिक पाटबंधारे विभागाने केले आहे.

# नवी दिल्लीत सलग दुसऱ्या दिवशी १६ मेट्रो स्टेशन बंद, प्रवाशांचे हाल

दैनिक आपला विदर्भ

नवी दिल्ली : राजधानी नवी दिल्लीतून महत्त्वाची बातमी आहे. सुरक्षेचा विचार करता नवी दिल्लीत सलग दुसऱ्या दिवशी मेट्रोचे प्रमुख स्थानकं प्रवाशांसाठी बंद ठेवण्यात आले आहेत. दिल्ली मेट्रो रेल कॉर्पोरेशनकडून याबाबतची माहिती देण्यात आली आहे. त्यामुळे प्रवाशांचे हाल होत आहेत. प्रवाशांना पर्यायी मार्गाचा अवलंब करावा लागत आहे. त्यामुळे प्रवाशांना काही प्रमाणात मनस्ताप सहन करावा लागतोय.

इंटरचेंजची सुविधा कायम : मेट्रोकडून बुधवारनंतर आजही (२३ जुलै) १६ स्थानकं बंद ठेवण्यात आली आहेत. त्यानुसार गुरुवारी सकाळी साडे ७ पासून पुढील आदेशापर्यंत १६ मेट्रो स्थानकांमध्ये प्रवेश देण्यात येणार नाही. मात्र राजीव चौक, मंडी हाऊस आणि केंद्रीय सचिवालय इथे इंटरचेंजची सुविधा कायम असणार आहे.

कोणत्या स्थानकांवर प्रवेश बंद? : लोक कल्याण मार्ग, राजीव चौक, पटेल चौक, रामकृष्ण आश्रम मार्ग, बाराखंभा रोड, सुप्रीम कोर्ट, सेवा तीर्थ, जनपथ, मंडी हाउस, केंद्रीय सचिवालय, आयटीओ, दिल्ली गेट, इंद्रप्रस्थ, खान मार्केट, जोर बाग आणि शिवाजी स्टेडियम या स्थानकांमध्ये प्रवाशांना प्रवेश नसेल, असी माहिती डीएमआरसीकडून देण्यात आली आहे.

इंटरचेंजची सुविधा कायम : राजीव चौक, मंडी हाऊस आणि केंद्रीय सचिवालय इथं इंटरचेंजची सुविधा कायम असणार आहे. प्रवाशी या स्थानकांवरुन मेट्रो गाडी बदलू शकतात. मात्र प्रवाशांना आत-बाहेर करता येणार नाही, असं डीएमआरसीकडून स्पष्ट करण्यात आलं आहे.

प्रवाशांना आवाहन काय? : प्रवासासाठी निघण्याआधी जवळील मार्गावरील माहिती घ्यावी. तसेच गरज असेल तर खासगी वाहनाचा वापर करावा, असं आवाहन डीएमआरसीकडून करण्यात आलं आहे. तसेच प्रवासासाठी बंद असलेल्या १६ मेट्रो स्थानकांच्या आसपासच्या प्रवाशांनी प्रवासासाठी घरुन आणखी लवकर निघावं, असंही आवाहन डीएमआरसीकडून करण्यात आलं आहे.

प्रवाशांसाठी १६ स्थानकं केव्हा सुरु होणार? : पुढील आदेशापर्यंत परिस्थिती कायम असेल, असं दिल्ली मेट्रोकडून स्पष्ट करण्यात आलं आहे. परिस्थिती पाहूनच १६ स्थानकांवरील मेट्रो सेवा पूर्ववत करण्याचा निर्णय घेतला जाईल. प्रवाशांनी मेट्रोबाबतची अपडेट डीएमआरसीच्या सोशल मीडियावरुन घ्यावी, असंही डीएमआरसीकडून प्रवाशांना आवाहन करण्यात आलं आहे.

# वारकऱ्यांसाठी नगराध्यक्ष अनिल केंदळे यांची 'विठ्ठलसेवा'; मोफत इंधन वाटपासह शहरात वृक्षारोपण मोहीम







दैनिक आपला विदर्भ

**वाशिम । प्रतिनिधी :** मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या वाढदिवसानिमित्त भारतीय जनता पक्षाच्या वतीने वाशिम शहरात विविध सामाजिक उपक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. या उपक्रमांमध्ये वाशिमचे नगराध्यक्ष अनिल केंदळे यांच्या पुढाकाराने राबविण्यात येत असलेली वारकऱ्यांसाठीची 'विठ्ठलसेवा' आणि शहरव्यापी वृक्षारोपण मोहीम विशेष लक्ष वेधून घेत आहे.

आषाढी एकादशीच्या पार्श्वभूमीवर पंढरपूरला विठ्ठलाच्या दर्शनासाठी जाणाऱ्या वारकरी आणि भाविकांच्या सेवेसाठी नगराध्यक्ष अनिल केंदळे यांनी पुढाकार घेत महालक्ष्मी पेट्रोल पंपाच्या माध्यमातून २१ ते २५ जुलै या कालावधीत पंढरपूरच्या दिशेने जाणाऱ्या वाहनांना मोफत इंधन उपलब्ध करून देण्याचा उपक्रम सुरू केला आहे. या सेवेमुळे वारकऱ्यांना प्रवासात दिलासा मिळत असून, अनेक भाविक या उपक्रमाचा लाभ घेत आहेत.

नगराध्यक्ष अनिल केंदळे यांनी सांगितले की, वारकऱ्यांची सेवा हीच विठ्ठलाची सेवा मानून हा उपक्रम राबविण्यात येत आहे. समाजोपयोगी कार्यातून वाढदिवस साजरा करण्याची संकल्पना अधिक व्यापक व्हावी, हा यामागील उद्देश आहे.

याचबरोबर वाशिम शहरातील विविध प्रभागांमध्ये मोठ्या प्रमाणावर वृक्षारोपण मोहीमही हाती घेण्यात आली आहे. नगराध्यक्ष अनिल केंदळे यांच्या नेतृत्वाखाली भाजपचे पदाधिकारी, नगरसेवक, कार्यकर्ते आणि नागरिकांच्या सहभागातून विविध ठिकाणी वृक्ष लागवड करण्यात येत आहे. पर्यावरण संवर्धनाचा संदेश देत शहर अधिक हिरवेगार करण्याचा संकल्प या मोहिमेतून व्यक्त करण्यात आला. सामाजिक बांधिलकी, पर्यावरण संरक्षण आणि वारकऱ्यांची सेवा या तिन्ही बाबींचा समतोल साधणाऱ्या या उपक्रमांमुळे नगराध्यक्ष अनिल केंदळे यांच्या पुढाकाराचे शहरातील विविध स्तरांतून स्वागत होत आहे. वाढदिवसानिमित्त केवळ औपचारिक कार्यक्रम न करता समाजहिताचे उपक्रम राबविण्याचा प्रयत्न नागरिकांच्या चर्चेचा विषय ठरत आहे.

## वृत्तविशेष...

### लोकमान्य बाळ गंगाधर टिळक यांना जयंतीनिमित्त मंत्रालयात अभिवादन

दैनिक आपला विदर्भ

**मुंबई । प्रतिनिधी :** भारतीय असंतोषाचे जनक आणि 'स्वराज्य हा माझा जन्मसिद्ध हक्क आहे आणि तो मी मिळवणारच' अशी गर्जना करून देशवासियांमध्ये राष्ट्रप्रेमाची ज्वाला पेटवणारे थोर स्वातंत्र्यसेनानी लोकमान्य बाळ गंगाधर टिळक यांच्या जयंतीनिमित्त आज मंत्रालयात सामान्य प्रशासन विभागाचे प्रधान सचिव डॉ. अतुल पाटणे यांनी त्यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले.

सामान्य प्रशासन विभागाचे अवर सचिव रामदास कोळेकर, कक्ष अधिकारी निलेश हरड, संदेश उतेकर, सार्वजनिक बांधकाम विभागाचे सहाय्यक कक्ष अधिकारी विजय शिंदे, अमोल चव्हाण यांनीही लोकमान्य बाळ गंगाधर टिळक यांच्या प्रतिमेस पुष्प अर्पण करून अभिवादन केले. यावेळी मंत्रालयातील अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

### लोकमान्य टिळक यांना जयंतीदिनी राजधानीत अभिवादन

दैनिक आपला विदर्भ

नवी दिल्ली: लोकमान्य बाळ गंगाधर टिळक यांच्या जयंतीदिनी निवासी आयुक्त तथा सचिव श्र्वेता सिंघल यांनी त्यांच्या प्रतिमेस पुष्पांजली वाहून अभिवादन केले.

कोपर्निकस मार्गस्थित महाराष्ट्र सदनातील सभागृहात आयोजित कार्यक्रमास, महाराष्ट्र परिचय केंद्राचे संचालक हेमराज बागुल, सहायक निवासी आयुक्त नितीन शेंडे, सहायक निवासी आयुक्त स्मिता शेलार, महाराष्ट्र सदनाचे व्यवस्थापक प्रमोद कोलपते यांच्यासह इतर अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

यावेळी व्यवस्थापक प्रमोद कोलपते यांनी लोकमान्य टिळक यांनी देशाच्या स्वातंत्र्यलढ्यात, राष्ट्रजागृतीत आणि सार्वजनिक क्षेत्रात दिलेल्या अमूल्य योगदानाचा परिचय करून दिला.

### राज्यपालांचे लोकमान्य टिळक यांना अभिवादन



दैनिक आपला विदर्भ

**मुंबई । प्रतिनिधी :** लोकमान्य बाळ गंगाधर टिळक यांच्या १७० व्या जयंती निमित्त राज्यपाल जिष्णु देव वर्मा यांनी गुरुवारी (दि. २३) लोकभवन, मुंबई येथे लोकमान्य टिळक यांच्या प्रतिमेला पुष्पांजली वाहून अभिवादन केले.

राज्यपालांचे सचिव डॉ. प्रशांत नारनवरे, सहसचिव एस. राममूर्ती, परिवार प्रबंधक डॉ. निशिकांत देशपांडे त्याचबरोबर लोकभवनातील अधिकारी, कर्मचारी; तसेच पोलीस अधिकारी उपस्थित होते.

### आम्ही २६ तारखेला..., ठाकरे बंधू पुन्हा एकत्र रस्त्यावर उतरणार; राज ठाकरेंची मोठी घोषणा

दैनिक आपला विदर्भ

**मुंबई । प्रतिनिधी :** महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे अध्यक्ष राज ठाकरे आणि उद्धव ठाकरेंच्या शिवसेनेनं २६ जुलै रोजी शक्तीप्रदर्शन पद्धतीचा मोर्चा आयोजित करणार असल्याची घोषणा केली आहे. मुंबईमध्ये आयोजित करण्यात आलेल्या संयुक्त पत्रकार परिषदेमध्ये राज ठाकरेंनी हा मोर्चा कुठून कुठे असणार? त्याची सांगता कशी होणार? यासंदर्भातील सविस्तर माहिती दिली आहे.

राज ठाकरेंनी पत्रकारांशी बोलताना, ज्याप्रकारे मुला-मुलींना मारलं जातंय. याचा पडसाद देशात, महाराष्ट्रात आणि मुंबईत उमटत आहेत. साधी गोष्ट होती. भाजपा विरोधात होते तेव्हा अनेक मंर्त्यांचे राजीनामे मागितले रझा अकादमीविरुद्ध मोर्चा काढलेला तेव्हा मुंबईचे पोलीस आयुक्त अरुण पटनायकांचा राजनीमा मागितलेला. त्यांना बाजूला करण्यात आलं होतं. २६११ च्या हल्ल्याच्या वेळेस कसाब आणि साथीदारांनी हल्ला केला तेव्हा आर. आर. पाटील यांनी बडी बडी देशो मे छोटी छोटी बातें होती रेहती हैं या एका वाक्यावरुन वरुन गृहमंत्री पद सोडाव लागलेलं, असं म्हटलं आहे.

पदाची जबाबदारी घेता तेव्हा पदाबरोबर आलेल्या अपयशाची जबाबदारी घ्या, इतकेच म्हणणे आहे. पहिल्यांदाच नीटचे पेपर फुटलेले नाहीत. तिसऱ्यांदा फुटलेत. नीट परीक्षा आणल्या तेव्हाच विरोध केलेला. सत्ताच एवढी होती की तेव्हा ऐकायची तयारी नव्हती. आजही नाहीये, असा टोला राज यांनी म्हटलं आहे. धर्मेंद्र प्रधानांचा राजीनामा मागितला होता. ज्या पद्धतीने मुलांना मारलं ते पाहता विषय पंतप्रधानांपर्यंत गेला आहे. मोदींनी काहीतरी ट्विट केलंय. त्याला काही अर्थ नाही. चर्चा केल्याने मिटलं असतं, असं राज ठाकरेंनी म्हटलं आहे.

# राष्ट्रीय आयुष वारी... विठ्ठल-रुक्मिणीच्या चरणी; पंढरपुरात वारकऱ्यांसाठी आयुष सेवा सुविधा केंद्र

दैनिक आपला विदर्भ







**बुलढाणा । प्रतिनिधी :** आषाढी वारीनिमित्त पंढरपूर येथे येणाऱ्या लाखो वारकऱ्यांना आरोग्य सेवा उपलब्ध करून देण्यासाठी केंद्रीय आयुष मंत्रालयाच्या वतीने ''राष्ट्रीय आयुष वारी... विठ्ठल-रुक्मिणीच्या चरणी'' या उपक्रमांतर्गत २४ ते २६ जुलै या कालावधीत विशेष आयुष सेवा सुविधा केंद्र उभारण्यात आले आहेत. केंद्रीय आयुष मंत्री (स्वतंत्र प्रभार) तथा आरोग्य व कुटुंब कल्याण राज्यमंत्री प्रतापराव जाधव यांच्या संकल्पनेतून हा उपक्रम साकारण्यात आला आहे.

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या आयुषविषयक संकल्पनेनुसार ग्रामीण भागात आयुर्वेद व इतर आयुष उपचारपद्धतींचा प्रचार-प्रसार व्हावा आणि वारकऱ्यांना प्राचीन भारतीय उपचारपद्धतीचा लाभ मिळावा, या उद्देशाने राष्ट्रीय आयुष अभियानांतर्गत ही सेवा उपलब्ध करण्यात आली आहे.

पंढरपूर येथे तीन रस्ता महाआरोग्य शिबिर, चंद्रभागा तीरावरील आरोग्य केंद्र (वाळवंट) आणि ६५ एकर परिसरातील आरोग्य केंद्र अशा तीन ठिकाणी आयुष सेवा सुविधा केंद्र सुरू करण्यात आली आहेत. येथे आयुर्वेद व होमिओपॅथी औषधांचे वाटप, योगविषयक मार्गदर्शन, स्नेहन-स्वेदन (वाफ उपचार), वारकऱ्यांसाठी तेल मालिश, विद्धकर्म, अग्निकर्म, चरण सेवा तसेच आयुषविषयक माहितीपर प्रदर्शनाची व्यवस्था करण्यात आली आहे.

या उपक्रमासाठी आयुष विभागातील वैद्यकीय अधिकारी, वैद्यकीय महाविद्यालयांतील प्राध्यापक, डॉक्टर व इंटर्न तसेच सोलापूर जिल्ह्यातील २८ आयुर्वेद व होमिओपॅथी महाविद्यालयांतील डॉक्टर आणि विद्यार्थी आरोग्य सेवा देणार आहेत. तसेच नेचरफिट संस्थेच्या वतीने औषध वाटप करण्यात येणार आहे. या उपक्रमाच्या तयारीचा आढावा घेण्यासाठी २३ जुलै रोजी पंढरपूर येथील ग्रामीण रुग्णालयात आरोग्य उपसंचालक डॉ. भगवान पवार, आयुष मंत्रालयाचे नियुक्त नोडल अधिकारी चंद्रकांत काटकर, युवराज वाघ, जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. वर्षा डोईफोडे, जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. सतीश कोपुरवाड, अतिरिक्त जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. नंदकिशोर घाडगे आणि आयुष नोडल अधिकारी डॉ. हर्षल जाधव यांच्या उपस्थितीत बैठक झाली. बैठकीनंतर त्यांनी आयुष सेवा सुविधा केंद्रांना भेट देऊन तेथील व्यवस्थेची पाहणी केली.

या उपक्रमाच्या माध्यमातून आषाढी वारीसाठी पंढरपुरात येणाऱ्या लाखो वारकऱ्यांना मोफत, सुलभ आणि दर्जेदार आयुष आरोग्य सेवा उपलब्ध होणार असून भारतीय पारंपरिक उपचारपद्धतीचा व्यापक प्रसार करण्यासही मोठी चालना मिळणार आहे.

## खामगावातून पंढरपूरसाठी विठ्ठल एक्सप्रेस रवाना; अजित पवार गटाचे नेते दिलीपकुमार सानंदा यांच्या हस्ते हिरवी झेंडी







दैनिक आपला विदर्भ

**खामगाव । प्रतिनिधी :** आषाढी एकादशीनिमित्त पंढरपूरला जाणाऱ्या वारकऱ्यांसाठी खामगाव रेल्वे स्थानकातून विठ्ठल एक्सप्रेसच्या दुसऱ्या फेरीचे यशस्वी आयोजन करण्यात आले. अजित पवार गटाचे नेते तथा माजी आमदार दिलीपकुमार सानंदा यांच्या हस्ते ट्रेनला हिरवी झेंडी दाखवून ही एक्सप्रेस पंढरपूरकडे रवाना झाली.

या प्रसंगी बोलताना दिलीपकुमार सानंदा यांनी पांडुरंगाच्या चरणी बळीराजाच्या सुखासाठी आणि चांगल्या पावसासाठी साकडे घातले. तसेच, नीट परीक्षेच्या मुद्द्यावरून त्यांनी केंद्र सरकारवर निशाणा साधला. नीट परीक्षेतील घोटाळ्यामुळे देशातील कोट्यवधी विद्यार्थ्यांचे भविष्य अंधारात ढकलले गेले आहे.

या अपयशाची नैतिक जबाबदारी स्वीकारून केंद्रीय शिक्षणमंत्री धर्मेंद्र प्रधान यांनी तात्काळ राजीनामा द्यावा, अशी जोरदार मागणी त्यांनी केली.तसेच आपल्या हक्कासाठी सनदशीर मार्गाने आंदोलन करणाऱ्या विद्यार्थ्यांवर पोलिसांनी केलेला लाठीचार्ज हा अत्यंत निषेधार्ह असल्याचे सांगत, दोषी पोलीस अधिकाऱ्यांना निलंबित करून विद्यार्थ्यांवर दाखल केलेले सर्व गुन्हे तात्काळ मागे घेण्यात यावेत, अशी मागणीही त्यांनी यावेळी पांडुरंगाच्या चरणी केली.

### अण्णा हजारे यांचे अहिल्यानगरमध्ये मौन आंदोलन; शिक्षणमंत्र्यांच्या राजीनाम्याची केली मागणी

**अहिल्यानगर :** दिल्लीमध्ये सुरू असलेल्या विद्यार्थ्यांच्या आंदोलनाला पाठिंबा देण्यासाठी व केंद्रीय शिक्षण मंत्री धर्मेंद्र प्रधान यांनी राजीनामा द्यावा, या मागणीसाठी ज्येष्ठ समाजसेवक अण्णा हजारे यांनी आज, गुरुवारी नगर शहरातील वाडिया पार्क क्रीडा संकुलाच्या आवारात असलेल्या महात्मा गांधी पुतळ्याजवळ आंदोलन सुरू केले आहे. यावेळी मोठ्या संख्येने विद्यार्थी व तरुण उपस्थित होते. यावेळी त्यांनी तिरंगा ध्वज उंचावत आंदोलनात सहभाग घेतला.अण्णा हजारे सहा वर्षानंतर मौन आंदोलन केले आहे. यापूर्वी सन २०१९ मध्ये त्यांनी शेतकऱ्यांच्या प्रश्नावर राळेगणसिद्धी येथे मौन आंदोलन केले होते. काही दिवसांपूर्वी माहिती अधिकार कायद्याच्या नियमावलीमध्ये राज्य सरकारने जाचक बदल केले याकडे लक्ष वेधत त्या नियमावली मागे घ्याव्यात या मागणीसाठी उपोषणाचा इशारा दिला होता. मात्र त्यांचे आंदोलन सुरू होण्यापूर्वीच, दोन दिवस आधी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी निमावलीला स्थगिती दिल्याने हजारे यांनी आंदोलन स्थगित केले होते.

## नाशिक जिल्ह्यात मुसळधार ! गोदावरीला पूर ; दुतोंड्या मारुतीच्या कमरेपर्यंत पाणी

दैनिक आपला विदर्भ

**नाशिक। प्रतिनिधी :** नाशिक शहर आणि संपूर्ण जिल्ह्यात बुधवारपासून जोरदार पाऊस सुरु आहे. जोरदार पावसामुळे जिल्ह्यातील अनेक नद्या, नाले दुथडी भरुन वाहत असून काही ठिकाणी रस्त्यावरुन पाणी वाहू लागल्याने रस्ता वाहतूक बंद करण्यात आली आहे. सततच्या पावसामुळे नाशिक शहराला पाणी पुरवठा करणारे गंगापूर धरण ८० टक्क्यांपर्यंत भरल्याने या हंगामात गंगापूर धरणातून प्रथमच विसर्ग सुरु करण्यात आला आहे. त्यामुळे गोदावरी नदीच्या पाणी पातळीत वाढ झाली असून गुरुवारी सकाळी रामकुंड परिसरातील दुतोंड्या मारुतीच्या कमरेपर्यंत पाणी आले.

नाशिक शहर परिसरात मंगळवारी रात्रीपासून संततधार सुरु असून बुधवारी रात्री पावसाचा जोर अधिक वाढला. गंगापूर धरणाच्या पाणलोट क्षेत्रात, पावसाची संततधार कायम असल्यामुळे गुरुवारी सकाळी ८ वाजता गंगापूर धरणातून सोडण्यात येणारा पाणी विसर्ग एकूण ३१६५ क्युसेक इतका करण्यात आला आहे. हा विसर्ग ज सकाळी ९.३० वाजता ४२३६ क्युसेक करण्यात आला. तसेच नंतर पुन्हा त्यात वाढ करण्यात आली असून सकाळी १०.३० वाजता एकूण विसर्ग ५२९५ क्युसेकपर्यंत वाढविण्यात आला. तर सकाळी ११ वाजल्यापासून विसर्ग ६,३५४ क्यूसेक्सवरून ७,४१३ क्यूसेक्स करण्यात आला आहे.

पावसाचा जोर कायम राहिल्यास विसर्ग टप्प्याटप्प्याने पुन्हा वाढविण्यात येणार आहे. त्यामुळे नाशिक पाटबंधारे विभागाच्या पूर नियंत्रण कक्षाने याबाबत सतर्कतेचा इशारा जारी केला आहे.

त्र्यंबकेश्वर, पेठ, सुरगाणा, इगतपुरी या तालुक्यांमध्ये पावसाचा जोर अधिक आहे. दरम्यान, जोरदार पावसामुळे नाशिक जिल्ह्यातील कडवा, भावली, पुनेगाव, हरणबारी ही धरणे पूर्ण भरली असून त्यांच्यातून विसर्ग सुरु आहे. याशिवाय दारणा धरणातून होत असलेल्या विसर्गात सकाळी ९ वाजता ७४६४ ने वाढ करण्यात आल्याने धरणातून आता १५४९८ क्युसेक विसर्ग सुरु आहे. नांदूर मध्यमेश्वर धरणातील पाणी छत्रपती संभाजीनगरसाठी महत्वाच्या असलेल्या जायकवाडीच्या दिशेने जाते. नांदूर मध्यमेश्वरमधून १३,४०७ क्यूसेकने विसर्ग सुरु होता.

ज्योतिर्लिंग त्र्यंबकेश्वर परिसरात बुधवारी रात्री सोसाट्याच्या वाऱ्याने एका घराचे पत्रे उडाले. मेनरोडवरून जाणाऱ्या भाविकांवर ते पडले. या दुर्घटनेत ३ भाविक जखमी झाले असून, यवतमाळ येथील अमित आढे हे गंभीर जखमी झाले. जखमींना तातडीने त्र्यंबकेश्वर उपजिल्हा रुग्णालयात आणि नंतर पुढील उपचारासाठी नाशिक जिल्हा रुग्णालयात हलविण्यात आले

## बुलढाणा जिल्ह्यात दत्तक विधान नियमावली २०२२ अंतर्गत पहिला दत्तक आदेश

### अनाथ चिमुकलीला मिळाले हक्काचे कुटुंब; जिल्हा प्रशासनाचा संवेदनशील पुढाकार

दैनिक आपला विदर्भ




**बुलढाणा । प्रतिनिधी :** महिला व बाल विकास विभागामार्फत राबविण्यात येणाऱ्या दत्तक विधान नियमावली, २०२२ अंतर्गत बुलढाणा जिल्ह्यातील पहिला दत्तक विधान आदेश यशस्वीरीत्या पारित करण्यात आला. या निर्णयामुळे एका अनाथ चिमुकलीला प्रेमळ, सुरक्षित आणि हक्काचे कुटुंब लाभले असून दत्तक पालकांचे अनेक वर्षांचे पालकत्वाचे स्वप्नही साकार झाले आहे.

दत्तक प्रक्रिया ही कायदेशीर तरतुदी, बालकाच्या सर्वोत्तम हिताचा विचार आणि सर्व आवश्यक पडताळण्या पूर्ण करून पारदर्शक पद्धतीने पूर्ण करण्यात आली. जिल्हाधिकारी डॉ. प्रवीणकुमार देवरे यांनी संबंधित आदेश पारित करून या संवेदनशील प्रक्रियेला अंतिम मान्यता दिली.

या प्रक्रियेत जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी, जिल्हा बाल संरक्षण अधिकारी, संरक्षण अधिकारी, संबंधित दत्तक संस्था तसेच सर्व संबंधित यंत्रणांनी समन्वयाने कार्य करून दत्तक प्रक्रिया यशस्वीरीत्या पूर्ण केली.

प्रत्येक बालकाला प्रेम, सुरक्षितता आणि सन्मानाने जगण्याचा अधिकार आहे. दत्तक व्यवस्थेमुळे निराधार बालकांना कुटुंबाचा आधार मिळण्याबरोबरच समाजात संवेदनशीलता आणि सामाजिक उत्तरदायित्वाची भावना अधिक दृढ होत असल्याचे यानिमित्ताने अधोरेखित झाले आहे.

महिला व बाल विकास विभागामार्फत पात्र व इच्छुक दाम्पत्यांनी अधिकृत दत्तक प्रक्रियेचा अवलंब करून निराधार बालकांना कुटुंबाचा आधार द्यावा, असे आवाहन प्रशासनातर्फे करण्यात आले आहे.

# दिल्लीतील विद्यार्थ्यांवरील लाठीचार्जच्या निषेधार्थ बुलढाण्यात शेकडो विद्यार्थी रस्त्यावर; शांतता मोर्चाद्वारे राष्ट्रपतींना निवेदन

दैनिक आपला विदर्भ






**बुलढाणा । प्रतिनिधी :** दिल्लीमध्ये विद्यार्थ्यांवर झालेल्या कथित लाठीचार्जच्या निषेधार्थ बुलढाणा शहरात गुरुवारी शेकडो विद्यार्थी, पालक आणि विविध क्षेत्रातील नागरिक मोठ्या संख्येने रस्त्यावर उतरले. हुतात्मा स्मारकापासून काढण्यात आलेल्या शांतता मोर्चाने शहरातील प्रमुख मार्गांवरून जिल्हाधिकारी कार्यालय गाठत निषेध व्यक्त केला.

मोर्चामध्ये सहभागी झालेल्यांनी काळे कपडे व काळ्या फिती परिधान करून निषेध नोंदवला. विद्यार्थ्यांच्या हातातील विविध संदेश देणारे फलक सर्वांचे लक्ष वेधून घेत होते. हा मोर्चा पूर्णपणे शांततेच्या मार्गाने काढण्यात आला.

यानंतर जिल्हाधिकाऱ्यांमार्फत महामहिम राष्ट्रपतींना निवेदन पाठविण्यात आले. निवेदनात विद्यार्थ्यांवर दाखल करण्यात आलेले गुन्हे तात्काळ मागे घेण्याची, घटनेची निष्पक्ष चौकशी करण्याची तसेच केंद्रीय शिक्षणमंत्र्यांचा राजीनामा घेण्यासह विविध मागण्या करण्यात आल्या.

यावेळी उपस्थितांनी विद्यार्थ्यांवरील कारवाईचा निषेध करत लोकशाही मार्गाने आंदोलन करण्याचा अधिकार अबाधित ठेवण्याची मागणी केली. विद्यार्थ्यांच्या प्रश्नांकडे केंद्र सरकारने गांभीर्याने लक्ष देऊन न्याय द्यावा, अशी अपेक्षाही आंदोलनकर्त्यांनी व्यक्त केली.